ePaper
वर्ष - 9 । अंक -142 | UDYAM-MH-26-0158827

## दोन्ही शिवसेना आमने-सामने, शिंदे आणि ठाकरेंचे कार्यकर्ते आपसात भिडले



महाईन्यूज ™

www.mahaenews.com । गुरुवार, दि. 15 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- मिशेलने गाजवले राजकोट मैदान!
- लॅनिंगने UP वॉरियर्सचा डाव सावरला
- अमेरिका इराण यांच्यातील तणाव
- 'तुम्ही अपयशी ठरलात पुरावे कुठे?

## मतदानाच्या आदल्या दिवशी नियम बदलले? राज ठाकरेंचा जोरदार हल्लाबोल

# आयोगाचे पाडू मशिन वादाच्या भोवऱ्यात!

### PADU मशीनवरून राज-उद्धव ठाकरे आक्रमक; निवडणूक आयोगावर गंभीर आरोप

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**मुंबई महानगरपालिकेच्या मतदानाला अवघे काही तास शिल्लक असताना राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मतदानाच्या एक दिवस आधीच निवडणूक आयोगाच्या निर्णयांवरून मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. प्रचारकालावधी संपल्यानंतरही घरोघर प्रचारास परवानगी देणे आणि 'पाडू' (PADU – PRINTING AUXILIARY DISPLAY UNIT) नावाचे नवे मशीन अचानक आणणे, यामुळे लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचा आरोप राज ठाकरेंनी केला आहे.**

मतदानाच्या पूर्वसंध्येला ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी भेट दिली. त्यानंतर दोन्ही नेते मुंबादेवीच्या दर्शनासाठी रवाना होण्यापूर्वी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या दोघांनीही निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

**प्रचार संपल्यानंतरही घरोघर प्रचाराला मुभा?**





निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार मुंबई महापालिका निवडणुकीसाठी प्रचाराचा कालावधी 13 जानेवारी रोजी सायंकाळी 5.30 वाजता संपला आहे. मात्र, यानंतरही उमेदवारांना घरोघर प्रचार करण्याची मुभा देण्यात आली. याच निर्णयावरून राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगावर गंभीर टीका केली.

राज ठाकरे म्हणाले, "आतापर्यंतच्या सर्व निवडणुकांमध्ये प्रचार संपल्यानंतर किमान एक दिवस शांततेचा असायचा. मतदानाच्या आदल्या दिवशी कोणताही प्रचार होत नसे. ही निवडणुकीची प्रथा होती. मात्र यावेळी ती का मोडण्यात आली? काल पाच वाजता प्रचार संपला, मग आज प्रचाराला मुभा कशी दिली?"

**"पत्रके वाटू शकत नाही, मग पैसे वाटू शकतात का?"**

राज ठाकरे यांनी प्रचाराच्या नावाखाली होणाऱ्या कथित गैरप्रकारांकडेही लक्ष वेधले. "पत्रके वाटण्यास बंदी आहे, मग पैसे वाटले जात असतील तर त्यावर कारवाई का होत नाही? ही मुभा आत्ताच का देण्यात आली? सरकारला जे हवंय ते करण्यासाठी निवडणूक आयोग काम करत आहे," असा आरोप त्यांनी केला.

राज ठाकरे पुढे म्हणाले, "दिनेश वाघमारे कशावरही उत्तर द्यायला तयार नाहीत. सगळ्या पदाधिकाऱ्यांना माझं आवाहन आहे की, आपापल्या विभागात लक्ष ठेवा. पैसे वाटप केलं जात आहे. आनंदाची गोष्ट म्हणजे काही जण त्याला विरोध करत आहेत. मात्र निवडणूक आयोग याला अप्रत्यक्ष मदत करत आहे, हा आमचा आरोप आहे."

**'पाडू' मशीनवरून नवा वाद**

या सगळ्या घडामोडींमध्ये निवडणूक आयोगाने आणलेल्या 'पाडू' (PADU) नावाच्या नव्या मशीनने वादाला आणखी धार दिली आहे. PADU म्हणजे Printing Auxiliary Display Unit. राज ठाकरे यांच्या म्हणण्यानुसार, हे मशीन उद्या मतदानाच्या दिवशी अनेक ठिकाणी ठेवण्यात येणार आहे आणि ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड झाल्यास याचा वापर केला जाणार आहे.

राज ठाकरे यांनी थेट सवाल उपस्थित करत म्हटलं, "निवडणूक आयोगाने आता 'पाडू' नावाचं नवीन मशीन आणलं आहे. ईव्हीएम बंद पडलं, तर हे मशीन वापरलं जाणार आहे. पण याबाबत कोणतीही माहिती आधी देण्यात आली नव्हती. ईव्हीएमला नवं मशीन जोडणार असाल, तर त्याची पूर्वकल्पना राजकीय पक्षांना का दिली नाही?" ते पुढे म्हणाले, "नवीन मशीन राजकारण्यांना दाखवावंसंही आयोगाला वाटलं नाही. यात गडबड होणार नाही, हे कशावरून? ही कुठली बेबंदशाही आहे? ही कसली लोकशाही आहे?"

### राज ठाकरेंचे थेट सवाल

- काल सायंकाळी 5 वाजता प्रचार संपला असताना आज प्रचाराला मुभा कशी दिली?
- आतापर्यंतच्या निवडणुकांमधील प्रचाराची प्रथा यावेळी का मोडली?
- मतदानाच्या आदल्या दिवशीही भेटीगाठी आणि प्रचाराची अधिसूचना आजच का काढली?
- प्रिंटींग ऑक्झिलरी डिस्प्ले युनिट अर्थात 'पाडू' नावाचे नवे मशीन का जोडले जात आहे?
- 'पाडू' मशीनबाबत राजकीय पक्षांना आधी माहिती का दिली नाही?
- सरकारला हव्या त्या गोष्टी करण्यासाठीच निवडणूक आयोग आहे का?

**उद्धव ठाकरेंचं निवडणूक आयोगाला पत्र**

यावेळी राज ठाकरे यांनी माहिती दिली की, ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी या संपूर्ण प्रकरणासंदर्भात निवडणूक आयोगाला पत्र लिहिले आहे. मतदानाच्या आदल्या दिवशी नियम बदलणे आणि नव्या मशीनबाबत माहिती न देणे, यावर आक्षेप नोंदवण्यात आला आहे.

**प्रशासनाची बाजू काय?**

दरम्यान, PADU मशीनबाबत प्रशासनानेही आपली भूमिका स्पष्ट केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी सांगितले की, PADU मशीन मुंबईत सरसकट वापरले जाणार नाही. "हे मशीन केवळ अपवादात्मक, आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यात येईल. ईव्हीएम मशीन अचानक बंद पडली किंवा तांत्रिक अडचण निर्माण झाली, तर बॅकअप म्हणून PADU मशीनचा वापर केला जाईल," अशी माहिती त्यांनी दिली.

**मतदानाच्या तोंडावर वाढले राजकीय वातावरण तापले....**

मुंबई महापालिकेच्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर हे सर्व आरोप-प्रत्यारोप होत असल्याने राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. प्रचाराच्या नियमांतील बदल, नव्या मशीनचा वाद आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर उठलेले प्रश्न यामुळे मतदान प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच शंका उपस्थित केली जात आहे. मतदानाच्या दिवशी मतदार काय निर्णय देणार, हे तर उद्याच स्पष्ट होईल. मात्र त्याआधीच निवडणूक आयोगाच्या निर्णयांमुळे निर्माण झालेला हा वाद मुंबईच्या राजकारणात मोठी चर्चा ठरत आहे.v

**‘काळी जादू’ केल्याची घटना** | **पुण्यनगरीत छुप्या प्रचाराचा ‘काळा खेळ’ उघड**

# प्रचार थांबला, पण राजकारण पेटलं!

## पुण्यात राजकीय तापमान शिगेला

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रचाराची अधिकृत वेळ संपली असली, तरी पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय तापमान अजूनही शिगेला पोहोचलेले दिसत आहे. पुण्यातील महर्षी नगर शनिवारी पार्क परिसरात मतदारांच्या कार्यालयाबाहेर कथित ‘काळी जादू’ केल्याची घटना समोर आल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे निवडणूक प्रक्रियेतील नैतिकता, कायदा-सुव्यवस्था आणि छुप्या प्रचाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.**




प्रभाग क्रमांक ३८ मध्ये मतदारांना विविध प्रकारे प्रलोभन दिल्याचे आरोप होत आहेत. काही ठिकाणी रोख रक्कम, तर काही ठिकाणी आश्वासनांची पेरणी झाल्याचा दावा करण्यात येत आहे. याचबरोबर काही प्रभागांमध्ये मतदारांची नावे अन्य प्रभागांमध्ये ‘शिफ्ट’ करण्यात आल्याचे गंभीर आरोपही पुढे आले आहेत. या कथित प्रकारांमुळे मतदानाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. प्रचार थांबल्यानंतरही राजकीय संघर्षाची धार कमी झालेली नाही. उलट, सोशल मीडियावर आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात असून विशेषतः TWITTER (एक्स) वर नेते, कार्यकर्ते आणि समर्थक आक्रमक भूमिका घेताना दिसत आहेत. थेट सभांऐवजी आता ‘डिजिटल रणांगण’ तापले असून, व्हिडीओ, पोस्ट, आरोपपत्रे आणि प्रत्युत्तरांचा मारा सुरू आहे. नियमबाह्य प्रचार, अप्रत्यक्ष आवाहने आणि सूचक संदेशांच्या माध्यमातून मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्याचे निरीक्षकांचे म्हणणे आहे.राजकीय विश्लेषकांच्या मते, प्रचारबंदीच्या काळात सुरू असलेला हा छुपा प्रचार अधिक धोकादायक ठरू शकतो. थेट भाषणांपेक्षा सोशल मीडियावरील सूचक, भावनिक आणि कधी कधी भीती निर्माण करणारे संदेश मतदारांच्या निर्णयावर खोल परिणाम करू शकतात. काळी जादूच्या कथित घटनेसारखे प्रकार हे केवळ अंधश्रद्धेचे नव्हे, तर मानसिक दबावाचे साधन असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे.दरम्यान, निवडणूक यंत्रणेसमोरही मोठे आव्हान उभे राहिले आहे.

प्रचारबंदीचे काटेकोर पालन, सोशल मीडियावरील

### अधिकृत प्रचाराची वेळ संपली

थेट सभांऐवजी आता ‘डिजिटल रणांगण’ तापले असून, व्हिडीओ, पोस्ट, आरोपपत्रे आणि प्रत्युत्तरांचा मारा सुरू आहे. नियमबाह्य प्रचार, अप्रत्यक्ष आवाहने आणि सूचक संदेशांच्या माध्यमातून मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्याचे निरीक्षकांचे म्हणणे आहे.राजकीय विश्लेषकांच्या मते, प्रचारबंदीच्या काळात सुरू असलेला हा छुपा प्रचार अधिक धोकादायक ठरू शकतो.

आचारसंहितेचे उल्लंघन आणि मतदारांवर होणाऱ्या अप्रत्यक्ष दबावावर नियंत्रण ठेवणे, हे प्रशासनासाठी कसोटीचे ठरणार आहे. एकीकडे ‘प्रचार संपला’ असे अधिकृत चित्र असले, तरी प्रत्यक्षात राजकारण नव्या पातळीवर सरकले असून, मतदानाच्या अखेरच्या टप्प्यात हा छुपा प्रचार निर्णायक ठरेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रचाराची अधिकृत वेळ संपली असली, तरी पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय तापमान अजूनही शिगेला पोहोचलेले दिसत आहे. पुण्यातील महर्षी नगर शनिवारी पार्क परिसरात मतदारांच्या कार्यालयाबाहेर कथित ‘काळी जादू’ केल्याची घटना समोर आल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे निवडणूक प्रक्रियेतील नैतिकता, कायदा-सुव्यवस्था आणि छुप्या प्रचाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रभाग क्रमांक ३८ मध्ये मतदारांना विविध प्रकारे प्रलोभन दिल्याचे आरोप होत आहेत. काही ठिकाणी रोख रक्कम, तर काही ठिकाणी आश्वासनांची पेरणी झाल्याचा दावा करण्यात येत आहे. याचबरोबर काही प्रभागांमध्ये मतदारांची नावे अन्य प्रभागांमध्ये ‘शिफ्ट’ करण्यात आल्याचे गंभीर आरोपही पुढे आले आहेत. या कथित प्रकारांमुळे मतदानाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. कार्यकर्ते आणि समर्थक आक्रमक भूमिका घेताना दिसत आहेत.

# तळेगाव दाभाडे नगरपरिषदमध्ये धुराळा

## उपनगराध्यक्षपदाची धुरा राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक काकडे यांच्याकडे

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (MAHARASHTRA LOCAL BODY ELECTIONS) निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. सध्या पालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरु असून लवकरच जिल्हा परिषदांचा निवडणूका होणार आहेत. तर यापूर्वी नगर पंयाचत आणि नगर परिषदांच्या निवडणूका पार पडल्या. यानंतर आता उपनगराध्यक्ष पदाची निवड केली जात आहे.**



दाभाडे नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदाची धुरा राष्ट्रवादी काँग्रेसचे अनुभवी नगरसेवक गणेश काकडे यांच्याकडे बिनविरोध सोपविण्यात आली. तसेच स्वीकृत नगरसेवक म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजी आगळे, बाबा मुलानी आणि भाजपचे सूरज सातकर यांच्या नावांना मंजुरी देण्यात आली. निकाल जाहीर होताच कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंद व्यक्त केला. नगरपरिषदेच्या निवडणुकीत महायुती झाली असून, त्यातून भाजपचे संतोष हरिभाऊ दाभाडे नगराध्यक्षपदी निवडून आले आहेत. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे १७, भाजपचे १० आणि १ अपक्ष, असे मिळून २८ नगरसेवक निवडून आले होते.

उपनगराध्यक्ष निवडीसाठी मंगळवारी नगरपरिषद सभागृहात पहिली सर्वसाधारण सभा नगराध्यक्ष संतोष दाभाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेस मुख्याधिकारी गिरीश दापकेकर, भाजपचे गटनेते इंदरमल ओसवाल यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते.निवडीनंतर आमदार सुनील शेळके तसेच विविध पदाधिकारी व नागरिकांच्या उपस्थितीत उपनगराध्यक्ष गणेश काकडे आणि नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.

### पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी

काकडे यांनी यापूर्वी तीन वेळा नगरसेवक, विरोधी पक्षनेते आणि उपनगराध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडली असून, महायुतीच्या ठरावानुसार अडीच वर्षांनंतर त्यांना नगराध्यक्षपदाची संधी मिळणार आहे.यावेळी आमदार सुनील शेळके यांनी शहरहितासाठी सर्वांनी मतभेद बाजूला ठेवून समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. नगराध्यक्ष संतोष दाभाडे यांनी मूलभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करून विकासकामांना गती देण्याचा निर्धार व्यक्त केला. तर उपनगराध्यक्ष गणेश काकडे यांनी येत्या काही महिन्यांत पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

## महापालिका निवडणूक : मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज

# 17 लाख 13 हजार मतदार बजविणार मतदानाचा हक्क

## आज 128 प्रभागातील उमेदवारांचे भवितव्य होणार मतपेटीत बंद

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मतदान प्रक्रिया भयमुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यंत्रणा सज्ज असून मतदारांनी आपला संविधानिक हक्क बजावण्यासाठी उत्स्फुर्तपणे मतदान करून इतर पात्र मतदारांना मताधिकार बजावण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी केले आहे.**




महापालिका क्षेत्रातील एकूण मतदार संख्या १७ लाख १३ हजार ८९१ इतकी असून यामध्ये ९ लाख ५ हजार ७२८ पुरुष, ८ लाख ७ हजार ९६६ स्त्रिया आणि १९७ इतर मतदारांचा समावेश आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, प्रभाग क्रमांक १६ हा ७५ हजार १०५ मतदारांसह सर्वाधिक मतदारांचा प्रभाग ठरला आहे, तर प्रभाग क्रमांक २३ मध्ये सर्वात कमी म्हणजे ३३ हजार ३३ मतदार आहेत. मतदारांच्या सोयीसाठी एकूण २ हजार ६७ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

यामध्ये काही तात्पुरत्या स्वरूपात मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली असून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय त्याची संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय क्रमांक १ अंतर्गत ५२, कार्यालय क्रमांक २ अंतर्गत ५४, कार्यालय क्रमांक ३ अंतर्गत ३, कार्यालय क्रमांक ४ अंतर्गत सर्वाधिक १०८, कार्यालय क्रमांक ५ अंतर्गत २७, कार्यालय क्रमांक ६ अंतर्गत २२, कार्यालय क्रमांक ७ अंतर्गत २३ तसेच कार्यालय क्रमांक ८ अंतर्गत ३३ तात्पुरती मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. अशा प्रकारे महापालिका कार्यक्षेत्रात एकूण ३२२ तात्पुरत्या मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**मतदान केंद्रावर मतदारांना मोबाईल नेण्यास मनाई**

मतदाराला त्याचे मतदान केंद्र, मतदार यादीतील आणि इतर आवश्यक माहिती देण्यासाठी स्लिपा महत्वाच्या आहेत. बूथ स्तरावरील अधिकाऱ्यांच्या सहाय्याने घरोघरी जाऊन या स्लिपांचे वाटप करण्यात आले आहे. याशिवाय स्लिप वाटर करताना मतदान केद्रांमध्ये मोबाईल घेऊन जाण्यास मनाई असल्याबाबत मतदारांना माहिती देण्यात आली आहे. याशिवाय, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय सर्व मतदान केंद्रावर स्वयंसेवक यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच मतदान केंद्राबाहेर मतदारांचे मोबाईल ठेवण्यासाठी मैथिली व आंगणवाडी सेविकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणी निश्चित केलेल्या ठिकाणी शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे. ई. व्ही. एम फेरीसाठी स्वतंत्र टेबल असणार आहेत. तसेच टपाली मतमोजणीसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. मतमोजणीचा प्रत्येक फेरीनिहाय निकाल जाहिर करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय नियोजन करण्यात आले असून सर्व निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्तरावर स्वतंत्र मिडीया सेलची व्यवस्था करण्यात येणार आहे.

### मतदान साहित्य वाटप केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी

दरम्यान, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी महापालिका कार्यक्षेत्रातील ८ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय उभारण्यात आलेल्या मतदान साहित्य वाटप केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी सुरू असलेल्या मतदान साहित्य वाटप प्रक्रियेचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. मतदान प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी करण्यात आलेल्या नियोजनाची तपासणी करताना साहित्य वितरण वेळेत, सुयोग्य व शिस्तबद्ध पद्धतीने होत आहे का, याची खात्री त्यांनी करून घेतली. या पाहणी दरम्यान उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सुप्रिया डांगे, अर्चना तांबे, डॉ. दिप्ती सूर्यवंशी, अर्चना पठारे, हिम्मत खराडे,अनिल पवार, नितीन गवळी, पल्लवी घाटगे, निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार, उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे तसेच ८ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह विविध कक्षांचे प्रमुख उपस्थित होते.

# महापालिका निवडणुकीसाठी पोलीस यंत्रणा तैनात

## सहा हजार पोलिसांचा फौजफाटा; आजपर्यंत 962 जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी -चिंचवड महापालिका निवडणुकीचे मतदान शांततेत पार पडण्यासाठी पिंपरी – चिंचवड पोलिसांनी तगडा बंदोबस्त तैनात केला आहे. सह पोलीस आयुक्त, दोन अपर पोलीस आयुक्त, आठ पोलीस उपायुक्त, विविध पथकांच्या कंपन्यांसह ६ हजार ९१ पोलीस सज्ज असणार आहेत. आचारसंहिता लागू झाल्यापासून आजपर्यंत ९६२ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. ५० उपद्रवींना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. तर, गुंडगिरी प्रवृत्तीच्या ४३८ जणांना पिंपरी – चिंचवड हद्दीबाहेर जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निवडणूक अनुषंगाने परवानाधारकांची एकूण १३०६ पिस्तुले जमा केली आहेत.**



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर सर्वच पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन, पथसंचलन तसेच मोठ्या प्रमाणात प्रतिबंधात्मक कारवाई केल्यानंतर प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेसाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. त्यानुसार, पोलीस आयुक्त, सह आयुक्त, दोन अपर पोलीस आयुक्त यांच्यासह ६ हजार ९१ पोलिसांचा फौजफाटा शहरात तैनात असणार आहे. पोलिसांची विशेष पथकेही शहरात गस्तीवर असणार आहेत. गर्दी होणाऱ्या किंवा वाहतुकीचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असणाऱ्या केंद्रांवर पोलीस आणि वाहतूक पोलिसांचा विशेष बंदोबस्त असणार आहे.

महापालिका निवडणूक भयमुक्त, पारदर्शक व नि:पक्षपातीपणे पार पडावी, यासाठी पिंपरी – चिंचवड पोलिस दल सज्ज झाले आहेत. सर्वत्र कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तसेच, मोठ्या प्रमाणात प्रतिबंधात्मक कारवाई केली असून सर्व हालचालींवर करडी नजर ठेवली जात आहे. पिंपरी – चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत एकूण ४२० इमारतींमध्ये २१३५ मतदान केंद्र आहेत. आचार संहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एकूण ३४ तपासणी पथके तयार करण्यात आली आहेत. त्याकरीता ६८ पोलीस अंमलदार नेमण्यात आलेले आहेत. आजपर्यंत पोलीस Dाायुक्तालय हद्दीत दैनंदीन तपासणी दरम्यान एकूण १६ लाख १७ हजाराची रोकड जप्त करून ताब्यात घेण्यात आली आहे. निवडणूक अनुषंगाने परवानाधारकांची एकूण १ हजार ३०६ पिस्तुले जमा केली आहेत. एकूण १२ ठिकाणी पोलीसांनी रूट मार्च करण्यात आले आहे. शेवटच्या टप्प्यात गुन्हेगार चेकिंग, गस्त, नाकाबंदी व रुट मार्च अधिक तीव्र करण्यात येणार असून असमाजिक व्यक्ती व गुन्हेगारांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येणार आहे.

आचारसंहिता लागू झाल्यापासून महाराष्ट्र दारूबंदी कायद्याअंतर्गत २७६ छापे घालून एकूण १० लाख ३६ हजार ९७२ रूपये किमतीचा दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एनडीपीएस कायद्यांअंतर्गत १८ छापे घालून एकूण ६६ लाख १९ हजार रूपये किमतीचा गांजा, एमडी, ओजी कुश गांजा असे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे. नऊ बेकायदा पिस्तुले जप्त केली असून ११ जणांना अटक केली आहे.

> “ पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाची निवडणुकीच्या दृष्टीने सर्व तयारी पूर्ण झाली आहे. निवडणूक ही निर्भय वातावरण, निप:क्षपाती, शांतता व सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस आयुक्तालय सुसज्ज आहे. नागरिक पोलिसांना कोणत्याही स्वरूपाची माहिती न घाबरता देऊ शकतात. पोलिसांना येणाऱ्या प्रत्येक कॉलची गांभीर्याने दखल घेतली जाईल. तसेच, सर्व नागरिक, कार्यकर्ते यांनी नियमांचे पालन करून पोलीस व प्रशासनाला सहकार्य करावे.
>
> **–विनयकुमार चौबे,** पोलीस आयुक्त.



## भूमिका

**मुंबईमध्ये सध्या निवडणुकीची धामधूम आहे. मुंबई कोणाच्या ताब्यात जाईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पण हीच मुंबई भविष्यात अस्तित्वात राहील की नाही याचा कोणी विचार करत नाही? आपली मुंबई ही सात बेटांचे शहर आहे. या शहराच्या भौगोलिक रचनेत समुद्राचे आणि खाडीचे स्थान महत्त्वाचे आहेत.**

# विकासाच्या नावाखाली खारफुटीची कत्तल

आज जेव्हा आपण उंच उंच इमारती आणि वेगवान रस्ते बांधत आहोत, तेव्हा याच इमारतींना, रस्त्यांना समुद्राच्या लाटांपासून वाचवणरी खारफुटी म्हणजेच कांदळवन मात्र नष्ट होत आहे. गेल्या काही वर्षांत विकासाचा वेग एवढा वाढला आहे की, ज्या निसर्गाने मुंबईला जपले, त्याच निसर्गाचा गळा आपण पायाभूत सुविधांच्या नावाखाली दाबत आहोत. खारफुटी म्हणजे दलदलीच्या भागात, जिथे गोड आणि खारे पाणी एकत्र येते, तिथे वाढणारी झाडे. मुंबईच्या किनारपट्टीवर प्रामुख्याने 'ॲव्हिसेनिया मरिना' (AVICENNIA MARINA) ही प्रजाती मोठ्या प्रमाणात आढळते. ही झाडे प्रतिकूल परिस्थितीत जगतात. सामान्य झाडांप्रमाणे केवळ जमिनीत रोवलेली नसतात; तर चिखल, खारट पाणी आणि कमी ऑक्सिजन अशा प्रतिकूल परिस्थितीत तग धरून राहण्यासाठी त्यांनी स्वतःची स्वतंत्र रचना विकसित केलेली



असते. जमिनीबाहेर आलेली खारटपणाशी जुळवून घेणारी पाने आणि बीजांकुर पाण्यातच रुजण्याची क्षमता या त्यांच्या विशिष्ट रचनेमुळेच ती जमिनीला घट्ट पकडून ठेवतात आणि लाटांचा वेग ७० ते ९० टक्क्यांपर्यंत कमी करतात. ही खारफुटीची वैशिष्ट्ये आहेत. परंतु खारफुटीला केवळ झाडांचा समूह मानणे ही मोठी चूक ठरेल. ती एक संपूर्ण जिवंत परिसंस्था आहे. या परिसंस्थेचे कार्य केवळ जैविक नसून ते थेट मानवी अस्तित्त्वाशी निगडीत आहे. खारफुटी समुद्र आणि शहर यांच्यातील नैसर्गिक संरक्षकभिंत म्हणून काम करते. बोली भाषेत सांगायचे झाले तर खारफुटी ही मुंबईची 'बॉडीगार्ड' आहे.

चक्रीवादळे, समुद्री लाटा आणि वाढती समुद्रपातळी यांचा पहिला आघात हा खारफुटी झेलते. तिची दाट मुळे आणि घनदाट वाढ लाटांचा वेग कमी करतात. त्यामुळे अंतर्भागात होणारे नुकसान काही प्रमाणात कमी होते. २००४ – ०५ च्या दरम्यान आलेल्या त्सुनामीनंतर अनेक देशांनी हे मान्य केले आहे की ज्या ठिकाणी खारफुटी शाबूत होती, त्या ठिकाणी जिवितहानी, वित्तहानी इतर ठिकाणच्या तुलनेने कमी झाली. मुंबईही जेव्हा जलमय होते, तेव्हा दाट खारफुटीलगतच्या भागांत कमी नुकसान होते. एका अभ्यासानुसार असे दिसून आले आहे की खारफुटीची जंगले ही इतर सामान्य जंगलापेक्षा तीन ते पाच पट जासत कार्बन शोषून घेतात. ज्यामुळे जागतिक तापमानवाढ (GLOBAL WARMING) कमी होण्यास मदत होते. खेकडे, मासे आणि अनेक स्थलांतरित पक्ष्यांसाठी हे हक्काचे घर आहे. मुंबईत खारफुटी तोडण्याची सुरुवात ब्रिटिश काळापासून सुरू झाली होती. त्याकाळी सात बेटांना एकत्र जोडण्यासाठी ही खारफुटी नष्ट करण्यात आली होती. पण तेव्हा मुंबईची लोकसंख्या कमी असल्याने त्याचा फारसा परिणाम जाणवला नाही. मात्र कालांतराने वाढत चाललेली लोकसंख्या, शहरीकरण यामुळे गेल्या तीन – चार दशकांत खारफुटी जंगले नष्ट करण्याचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. विकासाच्या नावाखाली वेगवेगळे प्रकल्प राबवताना सध्याच्या काळात बुलेट ट्रेन, कोस्टल रोड यांसारख्या प्रकल्पांसाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात खारफुटी तोडली गेली आहे. २००० च्या दशकात मुंबई उच्च न्यायालयाने याबाबतीत कडक निर्बंध आखले होते. त्यामुळे खारफुटी नष्ट करण्याचा वेग बऱ्यापैकी मंदावला असला तरी पर्यावरणप्रेमींचा असा दावा आहे की अलीकडील काळात कोस्टल रोड, मेट्रो यासारखे जे प्रकल्प राबवले जात आहेत त्यामुळे पुन्हा एकदा खारफुटींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. महाराष्ट्र वनविभागाच्या निरीक्षणात असे दिसून आले काही की मुंबई आणि लगतच्या भागांत हजारो हेक्टर जागेवर खारफुटी आहे, परंतु या प्रकल्पांसाठी ती नष्ट करावी लागणार आहे. नुकत्याच मिळालेल्या माहितीनुसार वर्सोवा-भाईंदर कोस्टल रोड प्रकल्पासाठी सुमारे ४५ हजार खारफुटी तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे.

## प्रासंगिक »

### सतराशे लुगडी

***कायदेकानूंचा अभाव हे भ्रष्टाचारामागील कारण नाही. तर अतिनियम; पण प्रामाणिक अंमलबजावणीची बोंब हे आपले दुखणे आहे...***

भारतीय प्रजासत्ताकास येत्या २६ जानेवारीस ७६ वर्षे पूर्ण होतील. या काळात ज्या काही समस्यांचे काय करायचे हे आपणास अजिबात आकळलेले नाही त्यातील एक म्हणजे भ्रष्टाचार. ही संज्ञा प्राधान्याने सरकारी सेवेतील कर्मचाऱ्यांबाबत वापरली जाते. सरकारी पदामुळे आपणास मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर करून व्यक्तिगत, संस्थात्मक फायदा मिळवणे म्हणजे भ्रष्टाचार अशी सोपी व्याख्या केल्यास ही संज्ञा खासगी क्षेत्रास तितकी का लागू होत नाही, हे लक्षात यावे. या देशात त्याविरोधात इतकी आंदोलने झाली; पण भ्रष्टाचार आहे तिथेच आहे. महाराष्ट्रात गोपीनाथ मुंडे यांनी शरद पवार यांच्या कथित भ्रष्टाचाराविरोधात आंदोलन छेडले. ट्रकभर पुरावे देणाऱ्या गो. रा. खैरनार-नामे दीड दशकभरापूर्वी अण्णा हजारेंनी गांधीवाद्याच्या थाटात याविरोधात लढा छेडला. किरण बेदी आदी उच्छृंखलांनी अण्णांस साथ दिली.

गेल्या काही आठवड्यांत भारताविषयीच्या दोन बातम्या शेजारीशेजारी झळकल्या—जणू एकमेकींची थट्टाच करत असल्यासारख्या. पहिली बातमी विजयाची होती: भारताने जपानला मागे टाकत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून स्थान मिळवले आहे.

# जागतिक क्रमवारीत पुढे, दैनंदिन जीवनात मागे!

काही तज्ज्ञांच्या मते, अपेक्षेपेक्षा वेगाने वाढ झाली असून लवकरच भारत तिसऱ्या क्रमांकावरही पोहोचू शकतो.दुसरी बातमी मात्र भीषण होती : इंदूरमध्ये सांडपाण्याने दूषित झालेले नळाचे पाणी प्यायल्याने किमान सात जणांचा मृत्यू झाला आणि १६० हून अधिक लोकांना रुग्णालयात दाखल करावे लागले. मुख्य पाणीवाहिनीवर थेट शौचालय बांधण्यात आले होते; आवश्यक सुरक्षा टाकी नसल्याने मानवी मलजल पिण्याच्या पाण्यात मिसळले. या दोन बातम्या मिळून आधुनिक भारताची खरी कहाणी सांगतात- विरोधाभासाची नव्हे, तर सहअस्तित्वाची. आकड्यांवर देश श्रीमंत होत असतानाच, दैनंदिन जीवनातील मूलभूत गरजांमध्ये तो धोकादायकरीत्या गरीब राहू शकतो. एकूण देशांतर्गत उत्पादन (जीडीपी ) म्हणजे अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या वस्तू आणि सेवांचे मूल्य. ते पाणी पिण्यास सुरक्षित आहे का, टाळता येण्याजोग्या आजारांनी मुले आजारी पडतात का, किंवा सार्वजनिक पायाभूत




सुविधा सक्षमपणे चालवल्या जातात का- हे मोजत नाही. जीडीपी व्यवहारांची बेरीज करतो; परिणामांचे लेखापरीक्षण करत नाही. जागतिक जीडीपी क्रमवारीत भारताची झेप खरी आहे.

तिच्यामागे देशाचा विस्तार, लोकसंख्येचे वजन आणि अर्थव्यवस्थेतील काही क्षेत्रांतील—विशेषतः सेवा, डिजिटल पायाभूत सुविधा आणि भांडवली निर्मितीतील—खऱ्या उत्पादकतेची वाढ आहे. मात्र विस्तार म्हणजे पुरेपूरता नव्हे. अर्थव्यवस्था मोठी असू शकते, तरीही ती नागरिकांना मूलभूत बाबींमध्ये अपयशी ठरू शकते.मोठ्या शहरात सांडपाणी पिण्याच्या पाण्यात मिसळत असेल, तर ती उत्पन्नाची नव्हे; शासन, नियमन आणि अंमलबजावणीची अपयशकथा आहे. ६ टक्के, ७ टक्के किंवा १० टक्के—कोणताही वाढदर आपोआप ती समस्या सोडवत नाही. इंदूरची दुर्घटना केवळ दारिद्र्यामुळे घडलेली नाही. ती संस्थात्मक दुर्लक्षाची परिणती आहे. पाणीवाहिनीवर सुरक्षा टाकीशिवाय शौचालय बांधणे हे मूलभूत अभियांत्रिकी आणि सार्वजनिक आरोग्य नियमांचे उल्लंघन आहे. असे उल्लंघन देश गरीब असल्यामुळे होत नाही; नियमांकडे दुर्लक्ष आणि जबाबदारीचा अभाव यामुळे होते. हीच भारताच्या वाढीची अस्वस्थ करणारी सत्यकथा आहे: आर्थिक विस्ताराने राज्याच्या क्षमतेला मागे टाकले आहे. रस्ते, विमानतळ, डिजिटल पेमेंट प्रणाली आणि कॉर्पोरेट नफा वेगाने वाढले; पण नगरपालिका शासन, नियामक देखरेख आणि स्थानिक सार्वजनिक सेवा तितक्याच वेगाने बळकट झाल्या जपान किंवा जर्मनीसारख्या देशांच्या तुलनेत भारतातील सरासरी उत्पन्न आजही फारच कमी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

मुंबईच्या सत्तेसाठी साकडं

उद्धव आणि राज ठाकरेंनी सहकुटुंब घेतले दर्शन

# ठाकरे बंधू मुंबादेवीच्या चरणी!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई महानगरपालिकेच्या सत्तेचा फैसला होण्यासाठी आता अवघे काही तास उरले आहेत. उद्या, गुरुवारी (१५ जानेवारी) होणाऱ्या मतदानापूर्वी आज मुंबईत एक विशेष आध्यात्मिक आणि राजकीय चित्र पाहायला मिळाले. शिवसेना (UBT) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे या दोन्ही ठाकरे बंधूंनी आपल्या कुटुंबासह मुंबईची ग्रामदेवता आई मुंबादेवीचे दर्शन घेतले. निवडणुकीच्या रणधुमाळीत विजयाचा आशीर्वाद मिळवण्यासाठी दोन्ही नेत्यांनी देवीला साकडे घातले.**

## आई मुंबादेवीच्या दरबारी परिवार



मुंबईची रक्षक मानल्या जाणाऱ्या मुंबादेवी मंदिरात आज सकाळपासूनच मोठी लगबग पाहायला मिळाली. गुरुवारी राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी मतदान होणार असून, त्यापूर्वी मुंबईच्या सत्तेचे महत्त्व ओळखून दोन्ही नेत्यांनी दर्शनासाठी वेळ काढली. सकाळी ११ च्या सुमारास उद्धव ठाकरे आपल्या पत्नी रश्मि ठाकरे आणि दोन्ही मुलांसह मंदिरात पोहोचले. यावेळी त्यांच्यासोबत पक्षाचे खासदार संजय राऊत आणि इतर प्रमुख नेते उपस्थित होते. ठाकरे कुटुंबाने देवीची विधीवत पूजा केली आणि आरतीमध्ये सहभाग घेतला. उद्धव ठाकरे मंदिर परिसरातून बाहेर पडल्यानंतर काही वेळाने राज ठाकरे आपल्या पत्नी शर्मिला ठाकरे आणि कुटुंबासह मंदिरात दाखल झाले. त्यांनीही आई मुंबादेवीची ओटी भरून विजयासाठी प्रार्थना केली. राजकीय विश्लेषकांच्या मते, ही निवडणूक दोन्ही ठाकरे बंधूंसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. मुंबई महानगरपालिकेवर वर्षानुवर्षे असलेल्या वर्चस्वाचा गड राखण्याचे मोठे आव्हान उद्धव ठाकरे यांच्यासमोर आहे. दुसरीकडे, राज ठाकरे यांची मनसे या निवडणुकीत मोठी भरारी घेऊन 'किंगमेकर'च्या भूमिकेत येण्यासाठी प्रयत्नशील आहे. मतदानापूर्वी देवीचे दर्शन घेऊन हिंदू मतांना आणि मराठी अस्मितेला साद घालण्याचा हा एक प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे.नाशिक, नागपूर आणि अकोल्यासह राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांसाठी उद्या

## ही निवडणूक प्रतिष्ठेची लढाई

सकाळी ११ च्या सुमारास उद्धव ठाकरे आपल्या पत्नी रश्मि ठाकरे आणि दोन्ही मुलांसह मंदिरात पोहोचले. यावेळी त्यांच्यासोबत पक्षाचे खासदार संजय राऊत आणि इतर प्रमुख नेते उपस्थित होते. ठाकरे कुटुंबाने देवीची विधीवत पूजा केली आणि आरतीमध्ये सहभाग घेतला. उद्धव ठाकरे मंदिर परिसरातून बाहेर पडल्यानंतर काही वेळाने राज ठाकरे आपल्या पत्नी शर्मिला ठाकरे आणि कुटुंबासह मंदिरात दाखल झाले.

मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकांना 'मिनी विधानसभा' म्हणून संबोधले जात आहे. शुक्रवारी (१६ जानेवारी) होणाऱ्या मतमोजणीनंतर राज्याच्या राजकारणाची पुढील दिशा स्पष्ट होणार आहे.मुंबादेवी मंदिर परिसरात व्हीआयपी भेटींमुळे आज कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान, निवडणूक आयोगाने उद्याच्या मतदानासाठी सर्व तयारी पूर्ण केली आहे. सत्तेचा फैसला होण्यासाठी आता अवघे काही तास उरले आहेत. उद्या, गुरुवारी (१५ जानेवारी) होणाऱ्या मतदानापूर्वी आज मुंबईत एक विशेष आध्यात्मिक आणि राजकीय चित्र पाहायला मिळाले. शिवसेना (UBT) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे या दोन्ही ठाकरे बंधूंनी आपल्या कुटुंबासह मुंबईची ग्रामदेवता आई मुंबादेवीचे दर्शन घेतले. निवडणुकीच्या रणधुमाळीत विजयाचा आशीर्वाद मिळवण्यासाठी दोन्ही नेत्यांनी देवीला साकडे घातले. मुंबईची रक्षक मानल्या जाणाऱ्या मुंबादेवी मंदिरात आज सकाळपासूनच मोठी लगबग पाहायला मिळाली. गुरुवारी राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी मतदान होणार असून, त्यापूर्वी मुंबईच्या सत्तेचे महत्त्व ओळखून दोन्ही नेत्यांनी दर्शनासाठी वेळ काढली.

# महायुती किंवा मविआला पाठिंबा नाही

## मराठा आरणक्षणाचे आंदोलक जरांगे यांनी समाजाला आवाहन केलं

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होतं आहे. निवडणुकीपूर्वी मराठा आरणक्षणाचे आंदोलक मनोज जरांगेंनी त्यांची भूमिका जाहीर केली आहे. महाविकास आघाडी किंवा महायुती कुणालाही पाठिंबा देणार नाही असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.**

मनोज जरांगे म्हणाले, माझा मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात होत असलेल्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी असा कुणालाही पाठिंबा नाही. माझे जुने व्हिडिओ कोणी व्हायरल करत असतील तर ते योग्य नाही, माझ्या नावाने कुणी पत्रकं प्रसिद्ध करत असतील तर त्यावर कुणीही विश्वास ठेवू नये. जर कुणी स्थानिक पातळीवर पाठिंबा दिला असेल तर तो त्यांचा व्यक्तिगत विषय असेल त्याचा आमच्याशी कोणताही संबंध नाही, असं मनोज जरांगे पाटील म्हटलं आहे.आपण या निवडणुकीमध्ये मुंबईसह महाराष्ट्रमध्ये कोणालाही पाठिंबा दिलेला नाही. मी महाविकास आघाडी किंवा महायुतीला कसलाही पाठिंबा दिलेला नाही. पाठिंबा दिल्याचं काही पत्रक प्रसिद्ध झाले असेल किंवा मुंबईमध्ये असले काही



प्रकार झाले असतील, परंतु माझा कुणालाही पाठिंबा नाही, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे. मराठा आरक्षणाला विरोध करणारे जर कोणी उभे असतील त्यांना मात्र मराठा समाजाने सहकार्य करू नये, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. ते लोक मराठा समाजाच्या लेकरांच्या मुळावर उठलेले आहेत, ते लक्षात घ्यावं. मुंबईसह, महाराष्ट्रात कोणाला पाठिंबा दिलेला नाही, हे लक्षात घ्यावं, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.महायुती किंवा

## कुणालाही पाठिंबा नाही

त्यांना सहकार्य करु नका. समाजाला विरोध करणाऱ्याला जागा दाखवा हे मला वाटतं, समाज हे करेलही असंही मनोज जरांगेंनी म्हटलं होतं. तसंच महापालिका निवडणूक म्हणजे जत्रा आहे असंही ते म्हणाले होते.मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होतं आहे.

महाविकास आघाडीला पाठिंबा दिलेला नाही. मुंबई असो की महाराष्ट्रातील इतर महापालिका निवडणुकीत कोणाला पाठिंबा दिलेला नाही. चळवळीत असणाऱ्या पोरांवर सर्वांनी लक्ष ठेवलं पाहिजे, असंही जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. कुणीही महापौर झालं तरीही काय होणार आहे? आम्हाला आरक्षण मिळणार आहे का? असे सवाल मनोज जरांगेंनी दोन दिवसांपूर्वीही उपस्थित केले होते. दरम्यान आता त्यांनी कुणालाही आमचा पाठिंबा नाही, पत्रकं वगैरे काढली गेली असतील तर ते साफ चुकीचं आहे असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. सध्याच्या स्थिती अशी आहे की कोण कुणाच्या बरोबर उभं आहे तेच कळत नाही. आरक्षणाला आणि आपल्या समाजाला ज्यांनी विरोधत केला.

## ट्रम्प इराणवर हल्ला करणार? अमेरिकेचे लष्करी कर्मचाऱ्यांना तळ सोडण्याचे निर्देश

# अमेरिका इराण यांच्यातील तणाव शिगेला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिका आणि इराण या दोन देशांमधील तणाव सध्या शिगेला पोहचला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधील आंदोलकांच्या मदतीला जाण्याची तयारी दर्शवली आहे. अमेरिका इराणवर हल्ला करण्याची शक्यता असतानाच इराणमधील एका नेत्याने आपल्या शेजारच्या देशांना धमकी दिली आहे.**

## इराणमध्ये लष्करी हस्तक्षेप





अमेरिकेकडून हल्ला होण्याची भीती असताना इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाघेर घलिबाफ यांनी मंगळवारी इराण "या प्रदेशाला आग लावेल" असा इशारा दिला आहे. या प्रदेशातील अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांसाठी हा एक अत्यंत गंभीर इशारा आहे.'मदत लवकरच पोहचेल' असे आश्वासन देत डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधील आंदोलकांना देशातील इंस्टिट्युशन ताब्यात घ्या असे आवाहन केले होते. त्याला २४ तासांहून अधिक काळ उलटून गेला आहे. ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत हे आवाहन केले होते. त्यांच्या या पोस्टनंतर अमेरिका लवकरच इराणमध्ये लष्करी हस्तक्षेप करेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. मात्र इराणमधील आंदोलन क्रूरपणे चिरडून टाकणे सुरूच असूनही अमेरिकेने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही.एनबीसी न्यूजने दिलेल्या वृत्तानुसार, इस्रायल आणि अरब अधिकाऱ्यांनी ट्रम्प प्रशासनाला सांगितले आहे की, त्यांच्या मते इराणमधील राजवट अद्याप इतकी कमकुवत झालेली नाही की, अमेरिकेचे लष्करी हल्ले ती उलथवून टाकण्यासाठी निर्णायक धक्का ठरतील. एनबीसी न्यूजशी बोलताना अज्ञात सूत्रांनी सांगितले की, इस्रायली आणि अरब अधिकाऱ्यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सध्या तरी मोठ्या प्रमाणात हल्ले करणे टाळण्याचा सल्ला दिला आहे. त्यापैकी काहींनी तर इराणमधील राजवट आणखी कमकुवत होईपर्यंत थांबण्यास सांगितले आहे.व्हाईट हाऊस मधील अधिकाऱ्याने सांगितले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याकडे अनेक पर्याय आहेत, ज्यापैकी लष्करी हस्तक्षेपाचा पर्याय देखील आहे. "इराणमधील परिस्थिती हाताळण्यासाठी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याकडे सर्व पर्याय उपलब्ध आहेत. कोणत्याही विषयावर राष्ट्राध्यक्ष वेगवेगळी मते ऐकून घेतात, पण अखेरीस स्वत:ला सर्वोत्तम वाटेल तोच निर्णय घेतात," असे अधिकाऱ्याने एनबीसी न्यूजशी बोलताना सांगितले.गेल्या काही दिवसांपासून अमेरिका आणि इराण या दोन देशांमधील तणाव वाढताना पाहायला मिळत आहे. इराणमध्ये सध्या सरकारविरोधी जोरदार आंदोलने सुरू असून ती चिरडण्याचे प्रयत्न केले जात आहेत. दुसरीकडे, अमेरिकेने इराणविरोधात लष्करी कारवाईची धमकी दिली आहे. यादरम्यान, इराणने अमेरिकन तळांना लक्ष्य करण्याचा इशारा दिल्यानंतर, अमेरिकेने मध्य पूर्वेतील आपल्या काही लष्करी कर्मचाऱ्यांना परत बोलवण्यास सुरुवात केली आहे. अमेरिकेने कोणतीही लष्करी कारवाई केली, तर आपण या प्रदेशातील अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य करू असा इशारा इराणने दिला आहे. दोन राजनैतिक सूत्रांनी एएफपीला सांगितले की काही कर्मचाऱ्यांना कतारमधील अल उदैद (AL UDEID) हा एअर बेस बुधवारी संध्याकाळपर्यंत सोडून जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. एका अमेरिकन अधिकाऱ्याने सीएनएनशी बोलताना स्पष्ट केले की, या भागात तणाव वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे. अल उदैद हा अमेरिकेचा मध्य पूर्वेतील सर्वात मोठा एअर बेस असून येथे सुमारे १० हजार अमेरिकन सैनिक आहेत.रॉयटर्सने दिलेल्या वृत्तानुसार, इराणने दिलेल्या इशाऱ्यानंतर या भागातील लष्करी तळावरून अमेरिका काही कर्मचाऱ्यांना माघारी बोलवत आहे. वरिष्ठ इराणी अधिकाऱ्याने सांगितले की अमेरिकन सैन्याला आश्रय देणाऱ्या शेजारच्या देशांना सांगण्यात आले आहे की, जर अमेरिकेने इराणवर हल्ला केला तर त्यांना लक्ष्य केले जाईल.

### इराणवर आक्रमणाची धमकी

यादरम्यान एका इराणी अधिकाऱ्याने रॉयटर्सला सांगितले की इराणने अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांना आवाहन केले आहे की, त्यांनी इराणवर अमेरिकेला हल्ला करण्यापासून रोखावे आणि अमेरिकेने हल्ला केला तर सौदी अरेबिया, युएई आणि तुर्कियेसह इतर देशांमधील अमेरिकेच्या तळांना लक्ष्य केले जाईल असा इशाराही देण्यात आला आहे.

# 'तुम्ही अपयशी ठरलात पुरावे कुठे आहेत?

## भारतीय उच्चायुक्तांनी निज्जर हत्या प्रकरणात कॅनडाला सुनावले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कॅनडा येथील भारताचे उच्चायुक्त दिनेश पटनायक यांनी नुकतेच दिलेल्या एका मुलाखतीत भारतावर आरोप करणाऱ्या कॅनडा सरकारला खडेबोल सुनावले आहेत. पटनायक यांनी हरदीप सिंग निज्जर याच्या हत्येशी भारत सरकारचा संबंध असल्याचा दावा जोरदारपणे फेटाळून लावला .**

इतकेच नाही तर त्यांनी कॅनडामधील प्रशासन त्यांच्या देशातील दहशतवादी घटकांच्या विरोधात कारवाई करण्यात "४० वर्षांपासून अपयशी" ठरले आहे, असा आरोपही त्यांनी केला. यावेळी पटनायक यांनी कॅनडा सरकारच्या दीर्घ काळापासूनच्या निष्क्रियतेवर तीव्र शब्दांमध्ये टीका केली. भारताला लक्ष्य करणारा कट्टरतावाद आणि हिंसेसाठी पोषक वातावरण निर्माण झाल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. सीबीसी न्यूजशी बोलताना पटनायक यांना कॅनडाचे माजी पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी केलेल्या आरोपांबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. ट्रूडो यांनी भारताने निज्जर याची हत्या करून कॅनडाच्या अंतर्गत घडामोडींमध्ये हस्तक्षेप केल्याचा आरोप केला होता. पटनायक यांनी आरोप हे पुराव्याशिवाय निराधार ठरतात



असे सांगत कॅनडाने पुरावे द्यावेत अशी मागणी केली. "मग, पुरावा कुठं आहे? प्रत्येकवेळी तुम्ही 'क्रेडिबल इन्फॉर्मेशन'बद्दल बोलत असता," असे पटनायक आरोप फेटाळताना म्हणाले."आम्ही नेहमीच सांगत आलो आहेत, हे हास्यास्पद आणि निरर्थक आहेत. हे असे काहीतरी आहे जे आम्ही करत नाहीत. या आरोपांना कुठलाही पुराव्याचा आधार नाही. असे आरोप करणे नेहमीच सोपे असते," असे पटनायक म्हणाले. पटनायक यांनी जोर देऊन सांगितले की कॅनडामध्ये सध्या सुरू असलेला कायदेशीर खटला भारताचा हस्तक्षेप दाखवून देत नाही. तसेच त्यांनी नमूद केले की कॅनडाचे माजी पंतप्रधान आणि त्यांच्या टीमने केलेल्या वक्तव्यांमध्ये या आरोपांचे मूळ आहे, असे वृत्त वृत्तसंस्था एएनआयने दिले आहे."तुम्ही आमच्यावर आरोप केले आहेत, पण आमचा सहभाग कुठे दिसून आला आहे? न्यायालयात हा खटला सुरू आहे... आणि न्यायलायत सुरू असलेले प्रकरण देखील चार व्यक्तींच्या विरोधात आहे. देशाविरोधात खटला कुठे आहे? माजी पंतप्रधानांनी त्यावेळी त्यांच्याकडे असलेल्या टीमच्या पाठिंब्याने सुरू केलेली ही चर्चा आहे.

### प्रत्यक्षात पुरावे कुठे आहेत?

त्यांना त्या विधानाला पाठिंबा देणे भाग होते. पण प्रत्यक्षात पुरावे कुठे आहेत? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. "आपण कोण काय म्हणाले यामध्ये जाऊ शकतो. पण अखेरीस हे प्रत्यक्षात समोर असलेल्या पुराव्यांवर येऊन थांबते," असे पटनायक म्हणाले. यानंतर जर विश्वासार्ह पुरावे सादर केले तर भारत कारवाई करण्यास तयार आहे, या भारताच्या पूर्वीपासूनच्या भूमिकेचा त्यांनी पुनरुच्चार केला.

# समजा आपण त्या जागी असतो तर : विशाखा सुभेदार

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे देशभरात संतापाची लाट पसरली आहे. या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानविरुद्ध अनेक कठोर निर्णय घेतले. अशातच, सोशल मीडियावर पहलगाम हल्ल्याबद्दल विशाखा सुभेदारने ( VISHAKHA SUBHEDAR ) लिहिलेल्या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तिची ही पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे. विशाखा सुभेदारने ( VISHAKHA SUBHEDAR ) फेसबुकवर ही पोस्ट लिहिली आहे. तिने लिहिलं की, इंटरनेट, सोशल




मीडिया सध्या सगळीकडे एकाच विषयावर बोलणं सुरू आहे पहलगाममध्ये घडलेली भयावह घटना... हिंसेला, आतंकवादाला वृत्ती जबाबदार की मती? 'असं व्हायला नको!', 'तसं व्हायला हवं', 'यांनी हे करायला हवं', 'त्यांनी तसं बोलायला हवं' पण ज्यांच्यावर तो प्रसंग ओढवला त्यांनी काय करायचं? आपलं माणूस गमावल्याचं दुःख, शोक करायचा आणि जाब विचारायचा तर तो कोणाला? ही गमावलेली माणसं येतील का परत?पुढे विशाखा सुभेदार लिहिलं, "जात, धर्म, वर्ण, भेद त्याचं केलं जाणारं राजकारण अशा आणि बऱ्याच गोष्टी आहेत. पण एखाद्या निष्पाप माणसाला जीवे मारण्याची वृत्ती ही येते कशी आणि कुठून? ही शिकवण देणारे आणि ती आपल्या चांगल्याचसाठी आहे हे मानणाऱ्यांना कसे थांबवायचे?

# राखीचा बुरखा घालून व्हिडीओ

गेल्या सहा वर्षांतील सर्वात मोठा दहशतवादी हल्ला २२ एप्रिलला जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झाला. पहलगाम येथील 'छोटे स्वित्झर्लंड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरनमध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केलं. यामध्ये २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. त्यामुळे सर्व स्तरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. भारतच नाही तर जगभरातून या दहशतवादी हल्ल्याविरोधात निषेध व्यक्त केला जात आहे. बॉलीवूड सेलिब्रिटी संताप व्यक्त करताना दिसत आहे. अशातच सुनील शेट्टीने पुढची सुट्टी काश्मीरमध्ये एन्जॉय करणार असल्याचं सांगितलं. तसंच राखी सावंतने देखील काश्मीर जाण्याचा निर्धार केला आहे. ती चाहत्यांना काश्मीर जाण्याचं आवाहन करताना दिसत आहे. राखी सावंतने तिच्या इन्स्टाग्राम पेजवर नुकताच एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये ती बुरखा घालून संवाद साधताना दिसत आहे. राखी म्हणते, "सलाम वालेकुम सभी को, नमस्ते, सत श्री अकाल, जय भारत, जय भीम, जय हिंदुस्तान, भारत माता की जय. आता आनंदी आहात. आपण सगळे एक आहोत. आपल्या हिंदुस्तानातून मुस्लिमांना कोणीही बाहेर काढू शकत नाही. भारत जितका हिंदूंचा आहे, तितकाच मुसलमानांचा देखील आहे. हिंदू-मुस्लिम असं करू नका. लहान मुलांसारख वागू नका. मोठे व्हा. जरा देवावर दया करा. देवाला इतक्या वेदना होतं आहेत की, मी या लोकांना निर्माण केलं आहे आणि ही सर्व माझी मुलं आहेत, माझी माणसं आहेत. पण, का लढत आहेत आणि मरत आहेत. यांना काय पाहिजे?"



# नवीना बोलेने साजिदवर गंभीर आरोप केले

बॉलीवूड इंडस्ट्री असो वा मराठी इंडस्ट्री... या क्षेत्रात काम करताना अनेक कलाकार मंडळींना कधी ना कधी त्यांच्या दिसण्यामुळे ट्रोलिंग आणि नकारात्मक प्रतिक्रियांचा सामना करावा लागतो. मुख्यत: या क्षेत्रात काम करताना अनेक महिला कलाकारांना अशा घटनांचा अधिक सामना करावा लागतो. असंच एका कलाकाराबरोबरही झालं होतं आणि ही कलाकार म्हणजे बॉलीवूडमधील लोकप्रिय व विनोदी अभिनेते जॉनी लिवर (JOHNNY LEVER) यांची मुलगी जेमी लिवर (JAMIE LEVER). जेमीला तिच्या लूकमुळे नकारात्मक प्रतिक्रियांचा सामना करावा लागला होता.जॉनी लिवर यांनी आजवर अनेक सुपरहिट हिंदी चित्रपटांमध्ये काम केलं आहे. आपल्या विनोदी भूमिकांनी त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत त्यांची मुलगी जेमी लिवर हिनं या क्षेत्रात पदार्पण केलं आहे. मात्र, इतर स्टार किड्सप्रमाणे तिला अगदी सहज प्रसिद्धी मिळालेली नाही. ती संघर्ष करीत या क्षेत्रात स्वतःचं स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, तिच्या दिसण्यामुळे तिला खूप त्रास झाला होता आणि यामुळे तिच्यावर टीकाही झाली होती.जेमी लिवरनं अलीकडेच टीव्ही अभिनेत्री छवी मित्तलच्या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिनं काही वर्षांत लोकांच्या मताचा आणि टीकेचा कसा सामना केला आणि याचा तिच्यावर कसा परिणाम झाला याबद्दल सांगितलं. बॉलीवूड इंडस्ट्री असो वा मराठी इंडस्ट्री... या क्षेत्रात काम करताना अनेक कलाकार मंडळींना कधी ना कधी त्यांच्या दिसण्यामुळे ट्रोलिंग आणि नकारात्मक प्रतिक्रियांचा सामना करावा लागतो.



# सूरज आमच्या घरी आला होता: निक्की तांबोळी

केदार शिंदे दिग्दर्शित 'झापुक झुपूक' हा मराठी सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. २५ एप्रिल २०२५ ला हा चित्रपट प्रदर्शित झाला. बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट उत्तम कमाई करीत असल्याचे समोर आलेल्या आकडेवारीवरून दिसत आहे. 'झापुक झुपूक' या चित्रपटात सूरज चव्हाण, जुई भागवत, इंद्रनील कामत हे कलाकार प्रमुख भूमिकांत दिसत आहेत. आता निक्की तांबोळीने सूरज चव्हाणच्या चाहत्यांसाठी एक खास गोष्ट केली आहे. तिने सूरजच्या चाहत्यांसाठी झापुक झुपूक या सिनेमासाठी थिएटर बुक केले आहे.'नवशक्ति' या चॅनेलने निक्की तांबोळीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला. या व्हिडीओमध्ये निक्की तांबोळी म्हणते, "काही दिवसांपूर्वी सूरज चव्हाण आमच्या घरी आला होता. त्याला शुभेच्छा देण्यासाठी मी एक व्हिडीओ बनवला होता. ज्यामध्ये मी म्हटलं होतं की त्याच्या चाहत्यांना मी त्याच्या चित्रपटांची तिकिटे देईन. त्यानंतर मला बरेच मेसेज आले. मग मी ठरवलं की, सूरजच्या चाहत्यांसाठी थेट शो बुक करते.निक्की तांबोळी पुढे म्हणाली, "सध्या मी उद्याचे दोन शो आधीच बुक केले आहेत. पुण्यातील मंगला थिएटरचा ७ चा शो आणि सिटी प्राइड कोथरूडला दुपारी ४ चा शो बुक केला आहे. त्यामुळे जे पुण्यात आहेत, त्यांनी नक्की भेट द्या."पुढे निक्की तांबोळीने असेही म्हटले की, मला हा सिनेमा खूप आवडला आहे.

## मालिका बरोबरीत

### न्यूझीलंडचा भारतावर ७ विकेट्सने विजय

# मिशेलने गाजवले राजकोट मैदान!

## केएल राहुलने इतिहास घडवला

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या ३ वनडे सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना राजकोटच्या सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात खराब क्षेत्ररक्षणाचा भारतीय संघाला चांगलाच फटका बसला. भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर विजयासाठी २८५ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघातील गोलंदाजांनी पूर्ण जोर लावला. पण क्षेत्ररक्षकांनी सोडलेल्या सोप्या झेलमुळे भारतीय संघाला हा सामना ७ गडी राखून गमवावा लागला आहे.**



भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर विजयासाठी २८५ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना न्यूझीलंडला सुरूवातीलाच मोठा धक्का बसला. डेव्हॉन कॉन्वे स्वस्तात माघारी परतला. हर्षित राणाने त्याला १६ धावांवर बाद करत माघारी धाडलं. तर हेनरी निकोल्सने १० धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या विल यंगने दमदार फलंदाजी केली. त्याने ८७ धावांची खेळी केली. त्याचं शतक अवघ्या १३ धावांनी हुकलं. त्याला कुलदीप यादवने बाद करत माघारी धाडलं. त्यानंतर डॅरिल मिशेलने शतकी खेळी केली आणि ग्लेन फिलिप्सने त्याला चांगली साथ दिली. डॅरिल मिशेल आणि विल यंगच्या भागीदारीमुळे हा सामना भारतीय संघाच्या हातून निसटला. शेवटी मिशेल १३१ धावांवर नाबाद राहिला.या सामन्यात भारतीय संघाला नाणेफेक गमवून प्रथम फलंदाजीसाठी यावं लागलं होतं. भारतीय संघाकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना रोहित शर्मा २४ धावांची खेळी केली. तर शुबमन गिलने ५६ धावा केल्या. विराट कोहलीने २३ धावा केल्या. श्रेयस अय्यर ८ धावा करत माघारी परतला. शेवटी केएल राहुलने भारतीय संघाचा डाव सांभाळला. केएल राहुलने नाबाद ११२ धावांची खेळी केली. रवींद्र जडेजाने २७ धावांची खेळी केली. भारतीय संघाने ५० षटकांअखेर ७ गडी बाद २८४ धावा केल्या.विल यंग आणि डॅरिल मिशेलच्या दमदार खेळीच्या बळावर न्यूझीलंडने भारतीय संघावर दमदार विजय मिळवला. याआधी झालेल्या पहिल्या सामन्यात भारतीय संघाने एकतर्फी विजयाची नोंद केली होती. आता न्यूझीलंडने हा सामना जिंकून मालिका १-१ ने बरोबरीत आणली आहे. मालिकेतील तिसरा सामना दोन्ही संघांसाठी निर्णायक ठरणार आहे. मालिकेतील तिसरा सामना १८ जानेवारीला इंदुरच्या आहिल्याबाई होळकर स्टेडियममध्ये खेळवला जाणार आहे.भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या ३ वनडे सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना राजकोटच्या सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात खराब क्षेत्ररक्षणाचा भारतीय संघाला चांगलाच फटका बसला. भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर विजयासाठी २८५ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघातील गोलंदाजांनी पूर्ण जोर लावला. पण क्षेत्ररक्षकांनी सोडलेल्या सोप्या झेलमुळे भारतीय संघाला हा सामना ७ गडी राखून गमवावा लागला आहे. भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर विजयासाठी २८५ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना न्यूझीलंडला सुरूवातीलाच मोठा धक्का बसला. डेव्हॉन कॉन्वे स्वस्तात माघारी परतला. हर्षित राणाने त्याला १६ धावांवर बाद करत माघारी धाडलं. तर हेनरी निकोल्सने १० धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या विल यंगने दमदार फलंदाजी केली. त्याने ८७ धावांची खेळी केली. त्याचं शतक अवघ्या १३ धावांनी हुकलं. त्याला कुलदीप यादवने बाद करत माघारी धाडलं. त्यानंतर डॅरिल मिशेलने शतकी खेळी केली आणि ग्लेन फिलिप्सने त्याला चांगली साथ दिली. डॅरिल मिशेल आणि विल यंगच्या भागीदारीमुळे हा सामना भारतीय संघाच्या हातून निसटला. शेवटी मिशेल १३१ धावांवर नाबाद राहिला.या सामन्यात भारतीय संघाला नाणेफेक गमवून प्रथम फलंदाजीसाठी यावं लागलं होतं.

### भारतावर एकतर्फी विजय!

रोहित शर्मा २४ धावांची खेळी केली. तर शुबमन गिलने ५६ धावा केल्या. विराट कोहलीने २३ धावा केल्या. श्रेयस अय्यर ८ धावा करत माघारी परतला. शेवटी केएल राहुलने भारतीय संघाचा डाव सांभाळला. केएल राहुलने नाबाद ११२ धावांची खेळी केली. रवींद्र जडेजाने २७ धावांची खेळी केली. भारतीय संघाने ५० षटकांअखेर ७ गडी बाद २८४ धावा केल्या.विल यंग आणि डॅरिल मिशेलच्या दमदार खेळीच्या बळावर न्यूझीलंडने भारतीय संघावर दमदार विजय मिळवला.

# लॅनिंगने UP वॉरियर्सचा डाव सावरला

## मेग लॅनिंगने एका दिवसात मोडला हरमनप्रीतचा मोठा रेकॉर्ड!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. या स्पर्धेतील सातवा सामना यूपी वॉरियर्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये सुरू आहे. या सामन्यात यूपी वॉरियर्सचा संघ नाणेफेक गमावून पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी उतरला आहे.**



प्रथम फलंदाजी करताना यूपी वॉरियर्सला सुरूवातीलाच मोठा धक्का बसला. किरण नवगिरे शून्यावर माघारी परतली. पहिल्याच षटकात स्फोटक फलंदाज माघारी परतल्यानंतर कर्णधार मेग लॅनिंगवर डाव सांभाळण्याची मोठी जबाबदारी होती. तिने डाव सांभाळला आणि महिला प्रीमियर लीग स्पर्धेत मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

या सामन्यात फलंदाजीला येण्यापूर्वी ती महिला प्रीमियर लीग स्पर्धेत १००० धावा करण्याच्या उंबरठ्यावर होती. या डावात फलंदाजीला आल्यानंतर ४ धावा करतात तिने महिला प्रीमियर लीग स्पर्धेत १००० धावा पूर्ण केल्या आहेत. यासह ती महिला प्रीमियर लीग स्पर्धेच्या इतिहासात १००० धावा करणारी तिसरीच फलंदाज ठरली आहे.

याआधी मुंबई इंडियन्सच्या फलंदाज नेट सिव्हर ब्रंट आणि हरमनप्रीत कौरने या स्पर्धेत १००० धावांचा पल्ला गाठला आहे. सर्वात आधी १००० धावा पूर्ण करण्याचा विक्रम हा नेट सिव्हर ब्रंटच्या नावावर होता. त्यानंतर मुंबई इंडियन्सची कर्णधार हरमनप्रीत कौरने गुजरात जायंट्स संघाविरूद्ध फलंदाजी करताना १००० धावांचा पल्ला गाठला. तिने या सामन्यात ७१ धावांची निर्णायक खेळी करून मुंबई इंडियन्सला विजय मिळवून दिला होता.

### ३८ चेंडूत ५४ धावा करून

मेग लॅनिंग या हंगामात पहिल्यांदाच यूपी वॉरियर्स संघाकडून खेळण्यासाठी मैदानात उतरली आहे.याआधी झालेल्या तिन्ही हंगामात तिने दिल्ली कॅपिटल्स संघाचं नेतृत्व केलं होतं. यासह दिल्लीला फायनलमध्येही पोहोचवलं होतं. पण ती दिल्लीला विजय मिळवून देऊ शकली नव्हती. यावेळी तिच्याकडे यूपी वॉरियर्सच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। गुरुवार ।
दि. 15 जानेवारी 2026
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये

# जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी!

### शिक्षण विश्व : ‘युवा दिन’ सोबत ‘महिला शक्ती’चा जागर!



। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**येथील न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वराज्य जननी राजमाता जिजाऊसाहेब आणि थोर विचारवंत स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात व सांस्कृतिक वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विद्यालयात ‘युवा दिन’ आणि ‘महिला शक्ती’ यांचा जागर करण्यात आला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या नाईक होत्या. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून अग्निस मॅडम, विजयकुमार माने , जयेश सर आणि वैभव हडप उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. अध्यक्षीय भाषणात विद्या नाईक यांनी स्वामी विवेकानंदांचे विचार आजच्या तरुण पिढीसाठी किती प्रेरणादायी आहेत, यावर प्रकाश टाकला.

“आजच्या तरुणांनी स्वामी विवेकानंदांचा संयम आणि जिजाऊसाहेबांचे शौर्य अंगीकारणे ही काळाची गरज आहे,” असे त्यांनी सांगितले.

यावेळी विजयकुमार माने सर आणि जयेश सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत राजमाता जिजाऊसाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर केलेले संस्कार, त्यांची दूरदृष्टी व राष्ट्रनिर्मितीतील योगदान याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी भाषणे सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अतिशय सुयोग्य पद्धतीने केले होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

# मतदान केंद्रांवर दिव्यांग व मतदारांसाठी विशेष सुविधा

### सर्व मतदान केंद्रांवर विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चे मतदान दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या मतदार सोयी सुविधा व दिव्यांग मतदार कक्षाच्या वतीने शहरातील ८ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ३२ प्रभागांमधील सर्व मतदान केंद्रांवर विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.**



> सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने मतदानाच्या दिवशी सर्व मतदान केंद्रांवर दिव्यांगासाठी विशेष सोयी-सुविधा पुरवण्यात आल्या असून, सर्व नागरिकांनी मतदानाचा अधिकार बजावून आपल्या संविधानिक कर्तव्याचे पालन करून लोकशाही प्रक्रिया बळकट करावी.
> **-ममता शिंदे,** - उप आयुक्त तथा नोडल अधिकारी, मतदार सोयी सुविधा

मतदान केंद्रांवर सर्व मतदारांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रकाश व्यवस्था, शौचालयांची सुविधा तसेच दिव्यांग मतदारांसाठी रॅम्पची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रांवर स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली असून, एकूण ४५३ व्हीलचेअर्स प्रभागनिहाय वाटप करण्यात आले आहेत. ज्या मतदान केंद्रांवर १० पेक्षा अधिक खोल्या आहेत, त्या ठिकाणी किमान दोन व्हीलचेअर्स उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.या सुविधांसाठी आरोग्य विभागाकडील कर्मचारी, मोरवाडी व कासारवाडी आयटीआय, डी. वाय. पाटील कॉलेज, महात्मा फुले कॉलेज, सिम्बॉसिस कॉलेज, भैरवनाथ ज्युनिअर कॉलेज येथील एन.एस.एस.चे विद्यार्थी, लाईट हाऊस प्रकल्पातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी, बालविकास प्रकल्प कार्यालयाकडील अंगणवाडी व बालवाडी शिक्षिका तसेच सक्षमा प्रकल्पांतर्गत कार्यरत महिलांची नेमणूक करण्यात आली आहे.

दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअरची सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच, इतर मतदारांसाठीही मतदानाच्या दिवशी विविध विशेष सोयी सुविधा पुरवण्यात येणार आहेत. मतदारांचे मोबाईल जमा करून त्यांना टोकन क्रमांक देण्यासाठी आवश्यक टोकन व साहित्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मतदान केंद्रांवरील गर्दी व्यवस्थापन व मतदारांच्या रांगा नियोजित पद्धतीने लावण्यासाठी एन.एस.एस.चे विद्यार्थी व इतर स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात येत आहे. या सर्व सुविधांमुळे दिव्यांग नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच सर्व मतदारांना सुलभ, सुरक्षित व सुरळीतरीत्या मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.

# पुण्यात 'माजी सैनिक किसान एकता शिखर संघा'ची स्थापना; 400 प्रतिनिधींचा एल्गार!

## अण्णा हजारे यांचा आशीर्वाद, किशोरराजे निंबाळकर यांचे प्रशासकीय सहकार्याचे आश्वासन

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**राज्यातील माजी सैनिकांचे हक्क, तसेच त्यांच्या सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय प्रश्नांना संघटितपणे वाचा फोडण्यासाठी 'माजी सैनिक किसान एकता शिखर संघ – महाराष्ट्र राज्य' या नव्या शिखर संघटनेची पुणे येथे उत्साहात स्थापना करण्यात आली. पुणे-आळंदी रोडवरील श्री ज्ञानेश्वर महाराज पादुका मंदिर परिसरात झालेल्या या ऐतिहासिक कार्यक्रमात राज्यभरातील सुमारे ४०० माजी सैनिक पदाधिकारी व प्रतिनिधींनी एकजुटीने संघर्ष उभारण्याचा निर्धार व्यक्त केला.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष तथा निवृत्त आयएएस अधिकारी किशोरराजे निंबाळकर उपस्थित होते. ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांनी या नव्या चळवळीला आपला पाठिंबा व आशीर्वाद दिला असून, त्यामुळे संघटनेला नवे बळ मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

### प्रशासकीय अडचणी सोडवण्यासाठी पुढाकार – निंबाळकर

अध्यक्षीय भाषणात किशोरराजे निंबाळकर म्हणाले, "देशसेवा करून नागरी जीवनात परतलेल्या माजी सैनिकांना अनेक प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागते. या समस्या सोडवण्यासाठी मी स्वतः पुढाकार घेऊन सिंहाचा वाटा उचलेन." राज्यातील सर्व माजी सैनिक संघटनांनी एकत्र येऊन संघटितपणे काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या वेळी संघटनेची राज्य, विभागीय व जिल्हास्तरीय कार्यकारिणी अधिकृतपणे जाहीर करण्यात आली. नवनियुक्त प्रमुख पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत —राज्य अध्यक्ष: हवालदार (नि.) शिवाजी ज्ञानदेव कदम, उपाध्यक्ष: सुबेदार मेजर (नि.) पांडुरंग भोसले, सचिव: हवालदार (नि.) देविदास रघुनाथ साबळे, कोषाध्यक्ष: हवालदार (नि.) ज्ञानदेव बाबुराव देवखिळे, कोअर कमिटी अध्यक्ष: सुबेदार मेजर (नि.) जगन्नाथ राधु खामकर, सदस्य: श्रीकृष्ण श्रीपत बंगाळे (नि.)

### विभागीय जबाबदाऱ्यांचे वाटप

कार्यक्रमात विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि खान्देश विभागातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या. माजी सैनिकांच्या प्रश्नांसाठी ही संघटना प्रामाणिकपणे व प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

# मतदान साहित्य मतदान केंद्रांवर पोहोचले

## 2067 मतदान केंद्र; 10335 कर्मचारी नियुक्त !

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने मतदान प्रक्रियेची तयारी अंतिम टप्प्यात असून मतदानासाठी आवश्यक असलेले मतदान साहित्य व मतदान केंद्रावरील पथके सुरक्षितपणे आपापल्या मतदान केंद्रांवर पोहोचली असल्याची माहिती निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार यांनी दिली.**

महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी शहरात एकूण २०६७ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या सर्व मतदान केंद्रांसाठी १०,३३५ अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये मतदान अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा विभागातील कर्मचारी, शिपाई, मजूर तसेच इतर सहाय्यक कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. सर्व पथकांना मतदान साहित्य देऊन नियोजित वेळेत मतदान केंद्रांवर रवाना करण्यात आले असून, ईव्हीएम यंत्रे, मतदानासाठी लागणारी कागदपत्रे, सीलबंद साहित्य तसेच अन्य आवश्यक सामग्री सुरक्षितपणे मतदान केंद्रांवर पोहोचविण्यात आली आहे.

उप आयुक्त सचिन पवार यांनी सांगितले की, मतदान प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण आणि निर्भय वातावरणात पार पडावी, यासाठी प्रशासनाकडून अत्यंत काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. मतदान पथकांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी पोलीस प्रशासन, वाहतूक विभाग आणि संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वय साधत काम केले. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये, यासाठी संवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष खबरदारी घेण्यात आली आहे.

शहरातील सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, मतदारांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ प्रवेश, रॅम्प, मदत कक्ष यांसारख्या सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, उद्या होणाऱ्या मतदानासाठी सर्व प्रशासकीय आणि सुरक्षात्मक व्यवस्था पूर्ण झाल्या असून, प्रशासन पूर्णतः सज्ज असल्याचे उप आयुक्त सचिन पवार यांनी स्पष्ट केले. मतदारांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजवावा आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले आहे.

www.rklgis.org

**RKL GALAXY**
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

# Teachers' Walk-In Drive

## Alert!

**17th & 18th January**

**24th & 25th January**

Hiring teachers for **all subjects** across **Pre-Primary, Primary,** and **Secondary sections** for the **academic year 2026–27.**



### Walk-In Schedule Timings:

**Saturday:**
2:00 PM – 5:00 PM

**Sunday:**
11:00 AM – 4:00 PM

### Venue:

RKL Galaxy International School,
Sr. No. 149/5, Opp. Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune – 412105

www.rklgis.org   8698360005

**Walk in with your resume and relevant documents**

# Time : The Greatest Gift for Preschool Students

PCMCI

For preschool children, time is more valuable than money or material things. What they truly need is play time, quality time, and emotional time with their parents and teachers. Playing together helps children learn, laugh, and express themselves freely. Quality time builds strong bonds and makes children feel loved and secure. Emotional time teaches them to understand feelings and develop confidence. Giving money or long leaves cannot replace the warmth of togetherness. A few mindful moments every day can shape a child's personality. Teachers guide children in school, while parents nurture them at home. Both play an equally important role in a child's growth. When parents and teachers give their time with love, children blossom beautifully.



Time is one of the most valuable gifts we can give our children. For preschool and school-going students, following time is not just a habit but the first step toward discipline and success. When children learn to do everything on time, they grow into responsible and confident individuals.

> Students should sleep on time, wake up on time, eat their meals on time, play on time, and study on time. A proper routine helps children stay healthy, active, and emotionally balanced. Time management from an early age builds focus, patience, and self-control. The concluding things I will say to parents if you can teach importance of time to tiny kids they can use that as a lifetime treasure .
>
> **- Ms.Archana Bhika,** Preschool Teacher
> Priyadarshani School, Moshi


